भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०७/२०१७

**१) संगनमत करून मॅग्नीजची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद.:—**

दिनांक ०५/०७/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून डोंगरी बु. माईन्सचे नार्थ कॅम्प मधील १८ सिमेंटच्या बोऱ्यामध्ये भरलेला ४९० किलो काळा दगळ (मॅग्नीज) कि. १०,०००/रु चा माल उत्खनन करून चोरून नेतांनी मिळुन आल्याने फिर्यादी साहेबराव लक्ष्मण इंगोले वय ५८ वर्ष, रा. डोगरी बु. यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९,३४ भांदवि. सहकलम ४८(७)(८) जमीन महसुल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा लिल्लारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अज्ञात चार चाकी वाहनाच्या निष्काळजीपनामुळे तिंघाना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ०५/०७/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील जखमी फिर्यादी अविनाश रमेश जागजोड वय २० वर्ष, रा. वळद जिल्हा गोंदीया हा त्याचे मोटार सायकल वर मावस बहीन सौ.रूपाली बाबु पाटील वय २० वर्ष पाचोरा व मासव भाऊ मनी रविन्द्र सोनटक्के वय ८ वर्ष रा. सिलेगाव (सिहोरा) यांना बसवुन जगनाडे चौक वरठी येथे पेट्रोल भरण्यास जात असतांना भंडारा कडुन येणाऱ्या अज्ञात आरोपी चार चाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक दिल्याने मोटार सायकल चालक व मागे बसलेल्यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४ ,१८७,१३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कुंभलवार पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ०५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, वरठी, तुमसर, आंधळगाव, पवनी व अडयाळ येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४९ लिटर हातभट्टी दारु किंमती ४,७००/—रु. व ३२३ लिटर ८२० मि.ली. देशी दारू + मारूती व्हॅन १ कि. १,९३३९६/रु. असा एकुण कि.१,९८०९६/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५ तीन सिटर वाहनांवरती २३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

सपोनी. बी.डी. कोडपे
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९७६४३८२२१४

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.